राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या अहवाल क्रमांक १८ ते २१ नुसार राज्याच्या इतर मागासवर्ग, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये नव्याने जाती समाविष्ट करणे व वगळणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: सीबीसी १०/२००८/प्र.क्र.२३५/मावक-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई:४०० ०३२,
दिनांक : २५ जून, २००८

वाचा:-
१. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१३६१/म, दि. २१.११.१९६१
२. शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक सीबीसी.१४६७/म, दि. १३.१०.१९६७,
३. शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक : सीबीसी १०९४/ प्र.क्र. २३६/मावक-५, दि.१३.६.१९९५
४. शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक : सीबीसी १०९८/प्र.क्र. १८५/इमाव-५, दि. १.१.२००१
५. शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, क्रमांक : सीबीसी १०९८/प्र.क्र. १८५/इमाव-५, दि.१४.२.२००१
६. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी.१४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दि. १.६.२००४
७. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी.१४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५, दि. २.६.२००४
८. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, क्रमांक:सीबीसी.१०९१/२०८४८/(१७१)/मावक-५, दि. २४.९.१९९१ चे शासन पत्र.
९. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक:सीबीसी १०/२००२/ प्र.क्र.१११/मावक-५, दि. २८.९.२००४ चे शासन पत्र..
१०. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी १०/२००५/प्र.क्र.८२/मावक-५, दि. १.३.२००६
११. शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी १०/२००५/प्र.क्र.८२/मावक-५, दि. २१.३.२००६
१२. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक रामाआ/ १८ वा अहवाल/०६-०७/२९४, दिनांक ३.७.२००६
१३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी १०/२००६/ प्र.क्र.८५/मावक-५, दि. ५.१०.२००६
१४. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक रामाआ/ १९ वा अहवाल/०६-०७/४२, दिनांक २४.१.२००७
१५. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक रामाआ/ २० वा अहवाल/०७-०८/२३३, दिनांक २३.५.२००७
१६. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक रामाआ/ २१ वा अहवाल/०७-०८/४०७, दिनांक २३.८.२००७

१७. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: सीबीसी ११/२००७/ प्र.क्र.३३८/मावक-५, दि. ६.१२.२००७

१८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची क्रमांक रामाआ/पुणे/ दुरुस्ती/०८-०९, दिनांक १०.४.२००८ ची दोन पत्रे

प्रस्तावना :- विमुक्त जाती / भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या याद्या शासनाने वरील अनुक्रमाक १, २, ३ या शासन निर्णयान्वये प्रसिध्द केल्या आहेत व त्यात वेळोवेळी सुधारणाही करण्यात आलेल्या आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा सहानी व इतर विरुध्द भारत सरकार व इतर यामध्ये दिलेल्या निदेशानुसार इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यासाठी व वगळण्यासाठी आलेल्या मागण्या व तक्रारीबाबत तपासणी आणि शिफारस करण्यासाठी शासनाने राज्य मागासवर्ग आयोग गठीत केला आहे. या आयोगाने यापूर्वीच शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींनुसार वरील जातींच्या यादीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने सन २००६ व २००७ मध्ये शासनास सादर केलेल्या १८ ते २१ अहवालातील शिफारशींनुसार काही जातींचा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या यादीत सामावेश करणे व काही जातींना यादीतून वगळणे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास सादर केलेल्या १८ ते २१ अहवालातील शिफारशींनुसार खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे नव्याने त्याचप्रमाणे तत्सम जाती म्हणून जाती / जमातींचा समावेश करण्याबाबत / वगळण्याबाबत शासन मान्यता देत आहे.

अ) राज्य मागासवर्ग आयोगाने शासनास केलेल्या शिफारशीनुसार खालील जातींचा इतर मागास वर्गीयांच्या यादीमध्ये नव्याने समावेश करण्यात येत आहे.

| इतर मागासवर्गीय यादीतील अ. क्र. | जातीचे नांव |
|---|---|
| ३४३ | लाडशाखीय वाणी |
| ३४४ | मुस्लीम धर्मीय काकर |
| ३४५ | दोरिक |
| ३४६ | पटवा |

ब) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील तत्सम/उपजातींचा इतर मागास वर्गीयांच्या यादीतील मूळ जातीसमोर नव्याने समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | इतर मागासवर्ग प्रवर्गातील मूळ जात व अनुक्रमांक | नव्याने समावेश करण्यात आलेली तत्सम जात / उपजात व तिच्या मूळ जातीचा अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | देवदिग - २८ | देवाडिगा |
| २ | पाटकर, सोमवंशीय सहस्त्रार्जून क्षत्रिय, पटवेकरी, पटवेगार, पटेगार, पट्टेगार, पटवी, क्षत्रिय पाटकर - १२६ | खत्री, क्षत्रिय |
| ३ | शिंपी/दर्जी - १५३ | मेरु शिंपी/मेरु क्षत्रिय शिंपी |
| ४ | सुतार, सुथार - १७४ | वाढई, वाढी, वढई, बाढई, बढई, वाढी, वाडी, वधाई पोट जाती :- झाडे सुतार, पांचाळ सुतार |

| | | |
|---|---|---|
| ५ | माळी - १८२ | पाचकळशी, तत्सम जात म्हणून :- सोमवंशीय पाठारे क्षत्रिय, पाठारे क्षत्रिय पाचकळशी, पाठारे क्षत्रिय, सुतार, सास्टीकर, घोडेखाउ, एस.के.पी. |
| ६ | काथार, काथार वाणी, कंटहार वाणी, वैश्य वाणी, कुलवंत वाणी, नेवी (लिंगायत वाणी व लाडवाणी वगळून) - १९० | धाकड, मिटकरी वाणी, वाणी, बोरळ, बोराळ, बोरुळ, बोरड, तांबोळी |
| ७ | लंझाड - १९७ | लझाड |
| ८ | भांडदुरा, बिल्लवा - २२४ | थिया, बेलछेडा |
| ९ | दोडे गुजर, गुजर , लेवे गुजर , रेवे गुजर , रेवा गुजर, सुर्यवंशी गुजर - ३२६ | बडगुजर, तत्सम जाती :- लोंढारी / पेंढारी |

क) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील जातीचा नव्याने विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विशेष मागास प्रवर्गाच्या यादीतील अनुक्रमांक | नव्याने समाविष्ट करावयाच्या जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | अनुक्रमांक ७ | मुस्लीम धर्मीय भंगी / मेहतर / लालबेग / हलालखोर / खाकरोब |

ड) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार खालील जातीचा विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये तत्सम जात म्हणून समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विशेष मागास प्रवर्गाच्या यादीतील अनुक्रमांक | नव्याने समाविष्ट करावयाच्या तत्सम जातीचे नांव |
|---|---|---|
| १ | अनुक्रमांक ३ चा ९ "पद्मशाली" | सालेवार |

इ) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील जातींचा/ तत्सम जातींचा भटक्या जमातींच्या यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | भटक्या जमातीच्या यादीतील अनुक्रमांक | नव्याने समाविष्ट केलेल्या तत्सम जाती / उपजाती व अनुक्रमांक |
|---|---|---|
| १ | अनुक्रमांक - १ गोसावी | अनुक्रमांक १ च्या क्रमांक १३ वर "पुरी" |
| २ | अनुक्रमांक - २ बेलदार | बेलदार कापेवार, बेलदार मुन्नर कापेवार, बेलदार मुन्नर कापु, बेलदार तेलंगा, बेलदार तेलगी, बेलदार पेंटरेडडी, बेलदार बुकेकरी |
| ३ | अनुक्रमांक - ८ लोहार | चितोडीया लोहार |

| | | |
|---|---|---|
| ४ | अनुक्रमांक - १७ मसनजोगी | २)शारदाकार / शार्दाकार / शारदाकाळ / बालासंतु |
| ५ | अनुक्रमांक - २५ भोई | अनुक्रमांक २५ मधील क्रमांक १८ वरील नावाडी पुढे भोई - नावाडी, तारु - नावाडी |
| ६ | अनुक्रमांक - २९ धनगर | अनुक्रमांक २९ मधील क्रमांक ८ वरील "शेगर" च्या पुढे "सगर, सेगर" |
| ७ | अनुक्रमांक - ३६ गवळी, मुस्लीम गवळी | गवलान, ग्वालवंश |

ग) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील जातींना इतर मागासवर्गातून वगळण्यात येत आहे.

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | यादीतून खालील अनुक्रमांकावरील वगळण्यात आलेल्या जातीचे नाव पुन्हा |
|---|---|---|
| १ | विशेष मागास प्रवर्ग | अ.क्र.६ वरील "मुन्नरकापू" व अ.क्र.७ वरील "कापेवार" |
| २ | विशेष मागास प्रवर्ग | अ.क्र.३ या ८ वरील "सालेवार" |
| ३ | इतर मागासवर्ग | अ.क्र. ४४ वरील गावलान (गवालवंश) |
| ४ | इतर मागासवर्ग | अ.क्र. १६५ वरील वढाई (सुतार) |
| ५ | इतर मागासवर्ग | अ.क्र. ३१३ वरील वाढई |

ड) राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार खालील जातींची नोंद सुधारीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | यादीत खालील अनुक्रमांकवर खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे |
|---|---|---|
| १ | इतर मागास वर्ग | अ.क्र. १८५ वरील "तलवार, कानडे" ऐवजी "तलवार -कानडे/ कानडी" |
| २ | इतर मागास वर्ग | अ.क्र. १९५ वरील "पानफरोश (मुस्लीम धर्मीय)" ऐवजी "(मुस्लीम धर्मीय, पानफरोश)" |
| ३ | इतर मागासवर्ग | अ.क्र. - २५४ वरील कलार, लाड, लाडवक, गीर कलाल, शिकारे या जातीच्या नोंदीपुढे "लाड ब्राह्मण वगळून" |

३. राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशींनुसार नव्याने भटक्या जमाती, इतरमागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गामध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या तसेच तत्सम जाती / पोटजाती, जमातींना सदरहू शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून जातीचे देय असलेले फायदे लागू होतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००१०६२६१३२८२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(एस. आरुमुगम)
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उप विभागीय अधिकरी ( महसूल)
तथा उप विभागीय दंडाधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - नागपूर,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा खंडपीठ- औरंगाबाद,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा खंडपीठ - औरंगाबाद,
संचालक समाजकल्याण/ विजाभज, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, प्राथमिक शिक्षण ,महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,

**त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना हयाबाबतच्या सूचना द्याव्यात.**

सर्व विभागीय समाजकलयाण अधिकारी/ सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगरे,
महा संचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, का- मावक-५

------